**कल्याण वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित वाहतूक नियंत्रण अधिसुचना रदद् करण्यात आले बाबत**


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/२७७ /२०२५ दि. १९ /१२/२०२५

**विषय :– वाहतूक नियंत्रण अधिसुचना रदद् करण्यात आले बाबत.**
**संदर्भ :– १) वाहतूक नियंत्रण अधिसुचना क्रमांक १४८, दिनांक २५/०७/२०२५ अन्वये**
**२) ठाणे पोलीस पत्रक दिनांक २५/०७/२०२५ अन्वये**

——oo——

**वाहतूक विभाग, ठाणे शहर** येथुन दिनांक २५/०७/२०२५ रोजी वाहतूक नियंत्रण अधिसुचना क्रमांक १४८/२०२५ अन्वये कल्याण वाहतूक उपविभागाचे हद्दीतील सहजानंद चौक हा अतिवर्दळीचा असुन सदर ठिकाणी संतोषी माता रोड, आग्रा रोड, अहिल्याबाई चौकाकडे जाणारा रोड, काळा तलाव, काळी मशिद कडे जाणारा रोड असे एकुण ६ रस्ते एकत्र येतात. सहजानंद चौकाकडुन संतोषी माता रोड मार्गे रामबागकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहीनीवर मोठया प्रमाणात रहदारी असल्याने सदर मार्गावरील वाहतूक संथ गतीने होवुन सहजानंद चौकात वाहतूक कोंडी होत असल्याने खालील प्रमाणे **प्रवेश बंद** व **एकदिशा मार्ग** करण्यात आलेला होता.

**प्रवेश बंद –** १) सहजानंद चौकाकडुन संतोषी माता रोड मार्गे रामबागकडे जाणाऱ्या वाहनांना **सहजानंद चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ही सहजानंद चौक – मकबरा रोड ने पुढे जावुन साती आसरा – मकबरा चौक येथे उजवे वळण घेवुन पुढे संतोषी माता चौक येथुन डावे वळण घेवुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) चिकणघर कडुन काळा तलाव मार्गे सहजानंद चौक कडे जाणाऱ्या वाहनांना **साती आसरा – मकबरा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ही साती आसरा – मकबरा चौक येथे डावे वळण घेवुन संतोषी माता चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**एकदिशा मार्ग –** संतोषी माता चौक ( कल्याण पोळी भाजी केंद्र ) ते सहजानंद चौक वरील मार्ग हा रामबाग कडुन संतोषी माता रोड मार्गे सहजानंद चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना एकदिशा मार्ग करण्यात येत आहे.

तरी वरील प्रमाणे निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना त्वरीत प्रभावाने रदद् करण्यात येत आहे.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली/उल्हासनगर व महानगरपालिका
– मा. आयुक्त, भिवंडी–निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी.
– मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई

– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा.ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर.
– उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.
– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली, महानगरपालिका
– विभाग नियंत्रण, राज्य परिवहन विभाग, ठाणे, कल्याण/विठठलवाडी.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
– विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर/भिवंडी

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ, कल्याण वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी, कल्याण वाउपवि.